|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/दिव्यांग-८६/३३४-ब/२०१९ दि. ०९/११/२०१९

प्रति,

**१) मा.प्राचार्य, संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मा.प्रा.परिसंस्था**

**२) मा.संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग**

**३) मा.कुलसचिव, अधिष्ठाता, संचालक, कार्यकारी अभियंता, विभागप्रमुख विद्यापीठ प्रशासकीय विभाग**

**विषय -: दि. ०३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याबाबत ..**

महोदय/ महोदया,

दिनांक ३ डिसेंबर हा दिवस जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा करण्याबाबत शासनाने निर्देशित केले आहे. यानिमित्ताने दिव्यांग विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सांस्कृतिक, क्रीडा, साहित्य अशा विविध गुणदर्शनाच्या स्पर्धा/कार्यशाळा/चर्चासत्र इत्यादी कार्यक्रम स्थानिक, तालुका, जिल्हा स्तरावर आयोजित करुन जागतिक दिव्यांग दिन साजरा करावयाचा असून त्यादिवशी केलेल्या उपक्रमाची माहिती शासनास पाठवावी.

आपणास कळविण्यात येते की, दि. ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग व सव्यांग विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता सांस्कृतिक, क्रीडा, साहित्य अशा विविध प्रकारच्या स्पर्धा/कार्यशाळा/चर्चासत्र इत्यादी कार्यक्रम स्थानिक, तालुका, जिल्हा स्तरावर आयोजित करावे. त्या अनुषंगाने विद्यापीठ संलग्न महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यामधील दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता कार्यशाळा **मंगळवार, दि. ०३ डिसेंबर, २०१९** रोजी सकाळी ११.०० वाजेपासून विद्यापीठाच्या अधिसभागृहात आयोजीत करण्यात आलेली आहे.

तरी आपल्याकडील दिव्यांग विद्यार्थी यांना विद्यापीठात येण्यासाठी आवश्यकता भासल्यास मदतनीस (Caretaker) म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेतील उत्साही विद्यार्थी व विद्यार्थी विकास अधिकारी यांना **मंगळवार, दि. ०३ डिसेंबर, २०१९** रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत कार्यशाळा स्थळी पाठवावे, त्यांचा येण्या व जाण्याचा प्रवास व भत्ता खर्च विद्यापीठामार्फत विहीत पध्दतीने अदा होईल. सदर दिवशी कार्यशाळेत उपस्थितांसाठी चहा, अल्पोपहार व भोजन व्यवस्था करण्यात आलेली आहे. कार्यशाळा सहभागासाठी संबंधितांची नोंदणी दूरध्वनीवरुन दि. १ डिसेंबर २०१९ पूर्वी करणे आवश्यक आहे.

कळावे.

आपला विश्वासू,

(डॉ. सत्यजित साळवे)
संचालक, विद्यार्थी विकास

**नोंदणीसाठी संपर्क :- ०२५७-२२५७४१८/४१९**

**प्रत :-**

१) मा.प्र-वित्त व लेखा अधिकारी
२) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय
३) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय
४) विभागप्रमुख, कुलसचिव कार्यालय